# शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, यवतमाळ

क्र/यजिप/शिवि/प्राथ/ 8226 /२०२५
शिक्षण विभाग (प्राथ)
जिल्हा परिषद,यवतमाळ दि ३०/६/२०२५

प्रति,

गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती--------------------

विषयः- **क्रांतीज्योती सावित्री बाई फुले जिल्हा शिक्षक पुरस्कार २०२५ करीता शिक्षकांचे प्रस्ताव पाठविणेबाबत.**

संदर्भ :- १) ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र.१०००/प्रक्र.३२४१/१५ दि.१२/१२/२०००
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग परिपत्रक क्र.पीटीसी २०२२/प्रक्र.३४ दि.२८ जुन २०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सन २०२५ करीता जिल्हा शिक्षक पुरस्कारासाठी शिक्षकांचे प्रस्ताव मागविण्यात येत आहे. गटशिक्षणाधिकारी यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्रात २ प्रतीत माहिती भरुन पाठवावी. स्वतंत्र प्रस्ताव पुस्तिका पाठविण्याची गरज नाही. शालेय दप्तर व सेवापुस्तक तपासून शिफारस करावी. ऑनलाईन माहिती **https://forms.glc/bUdetHzF3cCsYZ9N6** या लिंकवर ०९ जुलै **२०२५ पर्यंत भरावी.**

**जिल्हा शिक्षक पुरस्कार सन २०२५ साठी प्रस्ताव पाठवितांना खालील सुचनांचे पालन करावे.**

१) संदर्भिय शासन निर्णयातील तरतुदीप्रमाणे जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेतील पात्र शिक्षकांना वरिल लिंकवर ऑनलाईन प्रस्ताव सादर करण्यास आपल्यास्तरावरुन कळविण्यात यावे.
२) जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळातील शिक्षकांचे प्रस्ताव पाठवावे.
३) प्रत्येक तालुक्यातून १ प्राथमिक व १ माध्यमिक शिक्षकांची निवड करावयाची आहे त्यासाठी किमान प्राथमिक विभागातून ३ व माध्यमिक विभागातून कमीत कमी ३ शिक्षकांचे प्रस्ताव पाठवावे. प्रस्ताव पाठवितांना कला,क्रिडा,अपंग, संगीत अशा क्षेत्रामध्ये पारंगत शिक्षकांचा ही विचार व्हावा.
४) प्रतिनियुक्ती वरील जे शिक्षक सद्या वर्ग अध्यापन करीत नाहीत अशांची शिफारस करण्यात येवू नये.
५) शिक्षकाची एकूण सलग सेवा किमान १० वर्षे आवश्यक.
६) शिक्षकानी केलेल्या लगतच्या ५ वर्षाच्या सेवा कालावधीतील कार्याचे मुल्यमापन जिल्हास्तर समिती कडून करण्यात येईल.
७) शिक्षक निर्व्यसणी असल्याबावत व त्यांच्या कार्यपध्दतीबाबत शाळा व्यवस्थापन समितीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
८) गटविकास अधिकारी, सभापती पंचायत समिती यांचे संमतीने प्रस्ताव पाठवावे.
९) माहितीचे प्रपत्र २१.५ से.मी. ३४.५ से.मी.आकाराचे २ प्रतीत असावे.
१०) प्रपत्रात दिलेल्या माहितीनुसार पुरावा म्हणून फोटोग्राफ्स किंवा प्रमाणपत्र असावीत. ती लिंकवर अपलोड करावी.
११) प्रपत्राच्या दर्शनी भागावर शिक्षकांचे संपुर्ण नाव, शैक्षणिक पात्रता, शाळेचे नाव व पुर्ण पत्ता ऐवढेच असावे. कोणत्याही देवदेवतांचे थोर नेत्याचे फोटो असु नये.
१२) प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत दि.०९/०७/२०२५ ही असुन सादर केलेल्या प्रस्तावाची पडताळणी दि.१०/०७/२०२५ ला जिल्हा परिषद यवतमाळ येथे करण्यात येणार आहे.
१३) मुददेनिहाय पुरावे शक्यतो स्कॅन करुन सादर करावे.

**सहपत्र** :- १) वर्ग प्रगत असल्याचे गशिअ यांचे प्रमाणपत्र २ प्रती
२) चरित्र्य प्रमाणपत्र (पोलिस अधिक्षक) यांचे
३) शिक्षकाचे हमीपत्र (प्रतिस्वाक्षरी गशिअ) २ प्रती
४) नाखाते चौकशी प्रमाणपत्र २ प्रती
५) विभागीय चौकशी नसल्याचे प्रमाणपत्र २ प्रती
६) गोपनिय अहवाल गोषवारा ५ वर्षाचा
७) ऑनलाईन मुदयाची माहिती २ प्रती
८) यापूर्वी पुरस्कार मिळाला नसल्याचे प्रमाणपत्र २ प्रती
९) व्यसन नसल्याचे प्रमाणपत्र २ प्रती
१०) प्रतीनियुक्तीवर नसल्याचे प्रमाणपत्र २ प्रती

टिप :- ऑनलाईन मुदयाच्या व्यतिरिक्त कोणताही प्रस्ताव सादर करु नये.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, यवतमाळ